दिनांक ०२/०७/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आलोसे १) जगन्नाथ खंडेराव जाधव, अध्यक्ष लोकविकास नागरी सहकारी बॅक मर्यादित, औरंगाबाद, शाखा औरंगाबाद, २) आत्माराम संतराम पवार, पद- अकाऊटंट, राजश्री शाहु इस्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट कॉलेज, औरंगाबाद यांनी १,२५,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | आलोसे १)जगन्नाथ खंडेराव जाधव, अध्यक्ष लोकविकास नागरी सहकारी बॅक मर्यादित, औरंगाबाद, शाखा औरंगाबाद,<br>२) आत्माराम संतराम पवार, पद- अकाऊटंट, राजश्री शाहु इस्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट कॉलेज, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे एमआयडीसी सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १,२५,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांची अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळा अंतर्गत लोकविकास नागरी सहकारी बॅक मर्यादित, औरंगाबाद, शाखा औरंगाबाद येथून कर्जाची फाईल मंजुर करण्यासाठी व मंजुर केलेल्या कर्जाची उर्वरीत रक्कम बॅकेतून तक्रारदार यांना देण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | राजश्री शाहु इस्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट कॉलेज, औरंगाबाद येथे |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांची अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळा अंतर्गत लोकविकास नागरी सहकारी बॅक मर्यादित, औरंगाबाद, शाखा औरंगाबाद येथून कर्जाची फाईल मंजुर करण्यासाठी व मंजुर केलेल्या कर्जाची उर्वरित रक्कम बॅकेतून तक्रारदार यांना देण्यासाठी आलोसे जगन्नाथ जाधव हे १,२५,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, जगन्नाथ जाधव यांनी तक्रारदार यांच्याकडे १,२५,०००/- रु लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आत्माराम संतराम पवार, अकाऊटंट, राजश्री शाहु इस्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट कॉलेज, औरंगाबाद यांचेकडे देण्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक ०२/०७/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, आत्माराम संतराम पवार, अकाऊटंट, राजश्री शाहु इस्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट कॉलेज, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन १,२५,०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्याने दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. श्री. अरविंद चावरिया, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. सुजय घाटगे, पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना पोना बाळासाहेब राठोड, पोशि संतोष जोशी, केवल घुसिंगे, राजेंद्र सिनकर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

पोलीस उप अधीक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(सुजय यु.घाटगे)
पो.उप.अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो
औरंगाबाद